**<u>प्रेस नोट</u>** लाप्र.वि., जळगांव.

दि. २९/०५/२०२६.

**<u>बाजारपेठ पोलीस स्टेशन, भुसावळ,जळगांव येथील राजु सांगळे, पोलीस उपनिरीक्षक, वर्ग—२ (पाहीजे आरोपी) व सलिम हाकीम कुरेशी, रा.बोदवड (खाजगी इसम) यांच्याविरूध्द लाचमागणी कारवाई केलेबाबत.</u>**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक/जळगांव |
| **फिर्यादी** | श्रीमती स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,जळगांव. |
| **आरोपीताचे नाव व पत्ता** | १) राजु सांगळे, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन, जळगाव. **वर्ग—२ (पाहीजे आरोपी).**<br>२) सलिम हकीम कुरेशी, वय ४६ वर्ष, धंदा-मंजुरी, रा. कुरेशी मोहल्ला, बोदवड, जि.जळगांव |
| **पोलीस ठाणे व गुन्हा नोंद क्रमांक** | भुसावळ बाजारपेठ पो.स्टे., गु.र.नं. २८०/२०२६. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७, ७ (अ) प्रमाणे. |
| **लाचेची मागणी रक्कम** | ३०,०००/— रुपये तसेच तडजोडीअंती २०,०००/— रूपये. |
| **स्विकारलेली रक्कम** | — |
| **थोडक्यात हकिगत** | यातील मुळ तक्रारदार व त्यांचा मित्र यांचे एका इसमासोबत दि. २८.०३.२०२६ रोजी सायंकाळी खडका चौफुली भुसावळ येथे तक्रारदार यांनी उधार दिलेले पैसे परत मागत असतांना किरकोळ मारामारी झाली होती. त्यावरुन तक्रारदार व त्यांचा मित्र यांच्याविरुध्द भुसावळ बाजारपेठ पो.स्टे येथे सदर इसमाने गुन्हा दाखल केला होता.<br>त्यानंतर तक्रारदार यांना सदर गुन्हयात अटक न करण्याच्या मोबदल्यात ३०,०००/— रूपये दयावे लागतील, अशी मागणी तक्रारदार यांच्या पत्नीकडे करीत असल्याने त्याबाबत तक्रारदार यांनी दि. ०७.०४.२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगांव यांचेकडे श्री. सांगळे साहेब, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक—भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन, जळगाव व सलिम चाचा, रा.बोदवड खाजगी इसम यांचेविरूध्द लाच मागणी केल्याची तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची दि. ०७.०४.२०२६ रोजी लाचमागणी पंचासमक्ष पडताळणी केली असता आरोपी क्र. २ सलिम कुरेशी (खाजगी इसम) यांनी तक्रारदार यांच्यावर भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात अटक न करता केवळ चॅप्टर केस करुन सोडण्याचे मोबदल्यात श्री. सांगळे साहेब यांच्यासाठी ३०,०००/— रुपयांची लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी आलोसे क्र. १ श्री सांगळे, पोलीस उपनिरीक्षक, भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन यांची भेट घेतली असता यांनी तक्रारदार यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात अटक न करता केवळ चॅप्टर केस करून सोडण्याचे मोबदल्यात तडजोडीअंती २०,०००/— रूपयांची मागणी करुन स्विकारण्यास संमती दर्शवुन सदरची लाच रक्कम मिळवण्याचा प्रयत्न केला, म्हणुन गुन्हा. |
| **सापळा कारवाई** | **पर्यवेक्षण अधिकारी** — श्री. योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., जळगांव.<br>**सापळा अधिकारी** — श्रीमती स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगांव.<br>**सापळा पथक** — श्री. हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगांव, श्रेणी पोउनि/दिनेशसिंग पाटील, श्रेणी पोउनि/सुरेश पाटील, पोकॉ/अमोल सुर्यवंशी, पोकॉ/भुषण पाटील, पोकॉ/राकेश दुसाने, पो.कॉ. प्रणेश ठाकूर, सर्व नेमणुक — ला.प्र.वि. जळगांव.<br>**तपासी अधिकारी** — श्री. हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगांव. |
| **मार्गदर्शन** | **१) मा. श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा. श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव येथे सपंर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| **संपर्क पत्ता** | :- | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव. |
| **संकेतस्थळ** | :- | acbmaharastra.gov.in |
| **ई-मेल/ऑनलाईन तक्रार** | :- | spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com |
| **टोल फ्रि क्रमांक** | :- | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | :- | ०२५७-२२३५४७७ |
| **व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक** | :- | ७५८८६६१०६४. |